मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# रक्षक चौक 'सब-वे' च्या कामाला गती!

## महापालिका प्रशासन : विहीत मुदतीत काम पूर्ण करण्याचे नियोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सांगवी किवळे रस्त्यावर रक्षक चौक येथे सबवे उभारण्याच्या प्रकल्पाला गती देण्यात आली आहे. सद्यस्थितीत महत्त्वाच्या संरचनात्मक टप्प्यांपैकी काही टप्पे पुर्णत्वास आले आहेत. याशिवाय आरसीसी बॉक्सच्या पायाच्या खोदाई चे काम अंतिम टप्प्यात आले असून, दोन्ही बाजूंच्या रॅम्पच्या बांधकामास वेग देण्यात आला आहे. सबवे प्रवाशांसाठी खुला झाल्यानंतर नागरिकांना सुलभ आणि अडथळाविरहीत प्रवासाचा लाभ मिळणार आहे.

सद्यस्थितीत सबवेच्या आरई पॅनलचे ८० टक्के कास्टिंगचे काम पुर्ण झाले असून पायाभूत सुविधा, जलनि:सारण व्यवस्था आणि मार्ग संकेतांक बसवण्याचे काम सुरू आहे. वाहतूक सुरळीत राहावी यासाठी आवश्यक तात्पुरत्या पर्यायी मार्गांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच संपूर्ण प्रकल्प निर्धारित वेळेत आणि उच्च गुणवत्तेसह पूर्ण करण्यासाठी सातत्याने देखरेख ठेवली जात आहे.



**प्रकल्पामुळे प्रवाशांना होणारे लाभ**

सांगवी-कवळे मार्ग हा पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरांना जोडणारा तसेच मुंबईकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. वाढत्या शहरीकरणामुळे व औद्योगिक विकासामुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ वाढली आहे. तसेच, बीआरटी बससेवा, शालेय बसेस आणि रोजच्या चाकरमान्यांच्या संख्येतही मोठी वाढ झाली आहे. परिणामी, भविष्यात या रस्त्यावर होणारी वाहतुक कोंडी लक्षात घेता सबवे उभारण्याचे काम महापालिकेच्या वतीने हाती घेण्यात आले आहे.

प्रवाशांसाठी सबवे खुला केल्यानंतर वाहतूक सुरळीत होऊन इंधन आणि वेळेची बचत तर होईलच शिवाय पर्यावरणीय हानी टाळण्यास देखील मदत होणार आहे. विशेषतः पुणे, औंध व मुंबई, रावेत मार्गावरून जाणाऱ्या वाहनांसाठी हा मार्ग विनाविलंब आणि विनाअडथळा खुला राहील. परिणामी, पिंपळे निलख गावठाणामध्ये जाण्यासाठी होणारी वाहतूक कोंडी देखील टाळता येईल.

### प्रकल्पाचे स्वरूप

- » एकूण लांबी: ३६३ मीटर
- » औंध बाजूकडील रॅम्पची लांबी: १२५ मीटर
- » सबवेची लांबी : १८ मीटर
- » जगताप डेअरी चौक बाजूकडील रॅम्पची लांबी: २२० मीटर
- » सबवेची रुंदी : २६.४ मीटर
- » सबवेची उंची : ५.५ मीटर
- » निविदा रक्कम : १८ कोटी ६५ लाख

" रक्षक चौकात उभारण्यात येणारा सबवे म्हणजे शहराच्या वाहतूक व्यवस्थेत सकारात्मक बदल घडविणारे एक महत्त्वाचे पाऊल आहे. नागरिकांना सुरक्षित, सुलभ आणि विनाअडथळा वाहतूक मिळावी हा यामागचा उद्देश आहे. प्रदूषण आणि इंधनाच्या बचतीबरोबरच, हा प्रकल्प शहराच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरेल. संबंधित विभागांच्या समन्वयातून हा प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.

**- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

---

# शिलाई केंद्रामध्ये महापालिकेतर्फे मोफत फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण

## जास्तीत महिलांनी उपक्रमाचा लाभ घेण्याचे महापालिकेच्या वतीने आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका समाज विकास विभागाच्या वतीने भोसरी येथील शिलाई केंद्रामध्ये महिलांसाठी १७ मार्चपासून मोफत फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. याद्वारे एका बॅचमध्ये सरासरी ३० ते ३५ महिला प्रशिक्षण घेत आहेत. तसेच नुकत्याच दहावी व बारावी परीक्षा दिलेल्या विद्यार्थिनींसह विविध वयोगटातील महिलांचा या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमात महिलांना हाय स्पीड मशीन, पिकोफॉल मशीन, ओव्हर लॉक मशीन, एम्ब्रोईडरी मशीन, स्टीम आयर्न, इलेक्ट्रिक कटिंग मशीन इत्यादी आधुनिक यंत्रसामग्री वापरण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच डिझायनर ड्रेस, ब्लाऊज, स्कर्ट, फ्रॉक, वन पीस, घागरा, आरी वर्क, एम्ब्रोईडरी, फॅब्रिक पेंटिंग, बांधणी बाटिक वर्क अशा विविध कौशल्यांवर भर दिला जात आहे.



**उत्पादनांच्या जाहिरात व विक्रीसाठी डिजीटल मार्केटींगचे देखील देणार प्रशिक्षण**

महिलांना स्वतः शिवलेल्या कपड्यांची जाहिरात व विक्री करता यावी यासाठी डिजिटल मार्केटिंगचे प्रशिक्षण (इंस्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप) देखील दिले जात आहे. त्याचप्रमाणे, व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची उपलब्धता, विक्रीसाठी बाजारपेठ यासंदर्भात पाहणी दौऱ्यांचे आयोजन देखील करण्यात येत आहे.

### प्रशिक्षणासाठी विशेष प्रशिक्षकांची नेमणूक

**» फॅशन डिझायनिंगचे प्रशिक्षण महिलांना देण्यासाठी विशेष प्रशिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली यापूर्वीही कोरोना महामारीच्या काळात 'उमेद जागर' प्रकल्पातील महिलांना यशस्वीरित्या शिलाईचे प्रशिक्षण देण्यात आले होते. सध्या या प्रशिक्षकांच्या माध्यमातून जास्तीत जास्त गरजू आणि इच्छुक महिलांना या उपक्रमात सहभागी करून घेण्यात येत आहे.**

# पुणे महापालिकेच्या उत्पन्नात वाढ

## आतापर्यंतचे सर्वाधिक उत्पन्न : गेल्या वर्षीपेक्षा 12 कोटींनी अधिक

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेला २०२४-२५ या आर्थिक वर्षात ८ हजार २७२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळविण्यात यश आले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा १२ कोटी रुपयांनी उत्पन्न वाढले असून, आतापर्यंतच्या महापालिकेच्या इतिहासामध्ये मिळालेले हे सर्वाधिक उत्पन्न असल्याचा दावा महापालिकेकडून केला जात आहे.

महापालिका आयुक्तांनी २०२४-२५ वर्षासाठी महापालिकेचे ११ हजार ६०१ कोटींचे अंदाजपत्रक तयार केले होते. त्यापैकी ३१ मार्च अखेरपर्यंत ८ हजार २७२ कोटी रुपयांचा महसूल महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला. यामध्ये बांधकाम विभागाला बांधकाम परवानगीतून २ हजार ६०१ कोटी, मिळकतकरातून २ हजार ३६५ कोटी, जीएसटीमधून २ हजार ५०० कोटी, मीटरने पाणीपट्टीमधून ११६ कोटी, मुद्रांक शुल्कातून १९० कोटी, तर शासकीय अनुदान आणि इतर मधून ५०० कोटी असे ८ हजार २७२ कोटींचे उत्पन्न मिळाले. गेल्या वर्षी २०२३-२४ या आर्थिक वर्षात पुणे महापालिकेला ८ हजार २६० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. यंदा यामध्ये १२ कोटी रुपयांची वाढ झाली.




### बांधकाम विभाग सलग दुसऱ्या वर्षी सरस

» महापालिकेचा उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत म्हणून मिळकतकर विभाग आणि बांधकाम विभागाकडे पाहिले जाते. महापालिकेच्या बांधकाम विभागाला २०२४-२५ या आर्थिक वर्षात बांधकाम परवानगीतून सुमारे २ हजार ६०१ कोटींचे उत्पन्न मिळविण्यात यश आले आहे. तर, मिळकतकर विभागाला सुमारे २ हजार ३६५ कोटींचे उत्पन्न मिळाले आहे. त्यामुळे मिळकतकर विभागापेक्षा अधिक उत्पन्न मिळविण्यामध्ये बांधकाम विभागाने सलग दुसऱ्या वर्षी बाजी मारली आहे.

### वर्ष - महापालिकेचे अंदाजपत्रक - प्रत्यक्षात मिळालेले उत्पन्न

- » २०२०-२१ - ६ हजार २३९ कोटी - ४ हजार ७१३ कोटी
- » २०२१-२२ - ७ हजार ६५० कोटी - ६ हजार ८०६ कोटी
- » २०२२-२३ - ८ हजार ५९२ कोटी - ७ हजार १०० कोटी
- » २०२३-२४ - ९ हजार ५१५ कोटी - ८ हजार २६० कोटी
- » २०२४-२५ - ११ हजार ६०१ कोटी - ८ हजार २७२ कोटी

# स्व-मालकीच्या 'पीएमपी'साठी मुहूर्त लागेना

## मोडकळीतील बसमधून प्रवास : 400 पैकी केवळ 94 बस ताफ्यात दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

आर्थिक वर्ष संपले तरी, पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) ताफ्यात स्व-मालकीच्या २०० बस खरेदी करण्याचा मुहूर्त लागलेला नाही. तसेच खासगी तत्वावरील बस ताफ्यात दाखल होण्याची प्रक्रियाही विलंबाने होत आहे. त्यामुळे आयुर्मान संपलेल्या २८३ बस अद्यापही शहरातील विविध ररस्त्यांवरून धावत आहेत. मार्च महिन्यापर्यंत पीएमपी'च्या खासगी तत्वावरील ४०० पैकी केवळ ९४ बस ताफ्यात दाखल झाल्या आहेत, तर एकही आयुर्मान संपलेली बस मोडीत काढण्यात आलेली नाही.

पुणे, पिंपरी शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची 'जीवनवाहिनी' असलेल्या 'पीएमपी'च्या ताफ्यात गेल्या आर्थिक वर्षाप्रमाणे २८३ बसचे आयुर्मान संपलेले आहे. त्यानुसार वर्षभरात टप्प्याटप्प्याने या बस मोडीत काढण्यात येणार होत्या. मात्र, नवीन बस ताफ्यात दाखल होण्यास विलंब झाल्याने या बस अद्यापही सेवेत आहेत. शहरातील विविध रस्त्यांवरून बसचे मार्गक्रमण सुरू असून अनेकदा बस बंद पडणे, प्रवाशांचा खोळंबा होणे, मनस्ताप आणि रस्त्यावर वाहतूक कोंडी अशा समस्यांना सामोरे जावे लागत असून पीएमपीच्या वित्तीय तुटमध्येही हे एक प्रमुख कारण आहे.

'पीएमपी'च्या ताफ्यात स्व-मालकीच्या ९६४ बस आहेत, तर खासगी भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या १०१९ अशा एकूण एक हजार ९८३ बस रस्त्यांवरून धावत आहेत. त्यापैकी २८३ बसचे आयुर्मान आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये संपणार असल्याचे जाहीर करण्यात आले, तर ६०० नवीन बस ताफ्यात दाखल करण्याचे नियोजन 'पीएमपी' प्रशासनाने केले होते. मात्र, नवीन बस ताफ्यात दाखल होण्याल विलंब होत असल्याने आयुर्मान संपलेल्या बस मोडीत काढता येत नसल्याचे स्पष्टीकरण देत, टप्प्याटप्प्याने नवीन बस दाखल होण्यास सुरुवात झाली आहे, असे 'पीएमपी' प्रशासनाकडून सांगण्यात आले.



### पीएमपी बसचा आढावा

- » पीएमपीच्या ताफ्यातील एकूण बस – ९६४
- » खासगी तत्वावरील एकूण बस – १०१९
- » रस्त्यावर धावणाऱ्या एकूण बस – १०१९
- » आयुर्मान संपलेल्या बस – २८३
- » स्व-मालकीच्या प्रतीक्षेतील बस – २००
- » खासगी तत्वावरील प्रतीक्षेतील बस – ३०६
- » नव्याने दाखल झालेल्या बस – ९४ (खासगी)

> 'पीएमपी'च्या ताफ्यातील २८३ बसचे आयुर्मान संपले आहे, तर ६०० बस नव्याने घेण्याचे नियोजन आहे. खासगी तत्वावरील ४०० पैकी ९४ बस सेवेत दाखल झाल्या असून लवकरच टप्प्याटप्प्याने उर्वरीत बस दाखल होती. पीएमपी' स्व-मालकीच्या २०० बस घेण्याबाबतचे नियोजन अंतिम टप्प्यात आहे.
>
> **- नितीन नार्वेकर, सह व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल.**

# ठेकेदारांसाठीच केला जातोय 82 कोटींचा रस्ता

## भोसरीतील गवळी माथा ते इंद्रायणी चौकापर्यंतच्या रस्त्याची निविदा रद्द करा; माजी नगरसेवक मारुती भापकर यांची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून भोसरीतील गवळी माथा ते इंद्रायणी चौकापर्यंत सव्वा किलोमीटर रस्त्यासाठी ८२ कोटींचा खर्च केला जाणार आहे. या रस्त्याच्या कामासाठी महापालिका कर्ज काढणार आहे. प्रशासकीय राजवटीत ऋण काढून सण साजरे करण्याचा प्रकार सुरू आहे. हा रस्ता नागरिकांसाठी नव्हे तर ठेकेदाराचे खिसे भरण्यासाठी बांधला जात आहे. त्यामुळे ही निविदा रद्द करुन या प्रकरणाची सखोल चौकशी करावी. दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी माजी नगरसेवक मारुती भापकर यांनी केली आहे.

याबाबत भापकर यांनी महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहरातील टेल्को रस्त्यावर भोसरीतील गवळी माथा ते इंद्रायणी चौकापर्यंतचा सव्वा किलोमीटरचा रस्ता महापालिका अद्ययावत पध्दतीने विकसित करणार आहे. त्यामध्ये दोन्ही बाजूने मार्गिका, वाहनतळ, सायकल ट्रॅक, हरितपट्टा, सेवा वाहिन्या, पदपथ, व्यायामशाळा, शौचालय उभारणार आहे. या कामासाठी तब्बल ८१ कोटी ७७ लाख ५५ हजार ५५६ रूपये खर्च करण्यात येणार आहे. हे काम धनेश्वर क्रन्स्ट्रक्शनला देण्यास मान्यता दिली आहे.



### गरज नसतानाही अर्बन स्ट्रीटसारख्या संकल्पनांचा आग्रह

» महापालिकेच्या वतीने दापोडी ते निगडी आणि पिंपरी ते दापोडी या मार्गावर अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार पदपथ व सायकल ट्रॅक तयार करून सुशोभीकरण केले जात आहे. या कामासाठी सुमारे दीडशे कोटी रूपयांचा खर्च केला आहे. एकीकडे महापालिकेचे उत्पन्न कमी होत आहे. त्यामुळे उत्पन्न आणि खर्चाचे नियोजन करणे गरजेचे असताना प्रशासन अर्बन स्ट्रीटसारख्या संकल्पना राबवत आहे. यासाठी कोट्यवधी रूपयांचा खर्च करण्यात येत आहे. त्यामुळे भविष्यात महापालिकेची आर्थिक स्थिती नाजूक होणार आहे.

मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिकेतील काही अधिकारी, सल्लागार संगनमत करून विशिष्ट अटी शर्ती टाकून कोट्यवधीचा मलिदा लाटून राजकीय वरदहस्त असणाऱ्या ठेकेदारांनाच कामे मिळवून देत आहेत. हे भ्रष्ट अधिकारी संबंधित ठेकेदाराला संपूर्ण निविदा प्रक्रियेची अगोदरच माहिती देतात, दर निश्चिती करतात, रिंग घडवून आणतात. निविदा भरताना काही ठेकेदारांना दमदाटी करतात, स्पर्धा झाल्याचा आभास निर्माण करतात व महापालिकेच्या तिजोरीवर दिवसाढवळ्या दरोडे घालतात. प्रशासनाकडून विकासकामांच्या नावाखाली कोट्यवधी रूपयांचा चुराडा सुरू आहे. शहरातील टेल्को रस्ता हा मुख्य रस्त्यांपैकी एक महत्वाचा रस्ता आहे. केएसबी चौकापासून इंद्रायणीनगरपर्यंत हा रस्ता साडेआठ किलोमीटर अंतराचा आहे. त्यापैकी गवळी माथा ते इंद्रायणी नगर या सव्वा किलोमीटर अंतराच्या रस्त्याचा अद्यावत पध्दतीने विकास करण्यात येणार आहे. यासाठी महापालिकेने प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून मॅप्स ग्लोबल सिव्हिलटेक प्रा. लि. यांची नियुक्ती केली. रस्त्याचे आवश्यक सर्वेक्षण आणि नकाशे तयार केले. या सर्वेक्षणात सध्यःस्थितीतील सहा पदरी रस्ता अपुरा पडत आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी होत असल्याचे दिसून आले. त्यासाठी हा सव्वा किलोमीटर अंतराचा रस्ता विकसित करण्याचे नियोजन केले. त्यानुसार ९० कोटी ६५ लाख ७७ हजार ४५५ रूपयांची निविदा प्रसिध्द केली. यामध्ये केवळ दोन ठेकेदारांनी सहभाग घेतला. दोनवेळा निविदेला मुदतवाढ दिल्यानंतरही मे. धनेश्वर क्रन्स्ट्रक्शन आणि अजवाणी इन्फ्रास्ट्रक्चर या दोनच ठेकेदारांनी या कामासाठी निविदा भरली. त्यानंत र महापालिकेने ११ टक्के कमी दराची धनेश्वर क्रन्स्ट्रक्शन प्रा. लि. या ठेकेदाराची निविदा स्विकारली. त्यांच्याकडून ८१ कोटी ७७ लाख ५५ हजार ५५६ रूपयांमध्ये काम करून घेण्यास आपण आयुक्त तथा प्रशासक म्हणून मान्यता दिली आहे.

### एकाच ठेकेदाराला कोट्यवधींची कामे कशी?

» महापालिकेतील स्थापत्य विभागात कामे करणारा मे. धनेश्वर कंट्रक्शन प्रा.लि. हा ठेकेदार राजकीय हितसंबंधातील असून महापालिकेचे बहुतांश मोठ्या रकमेची कामे त्याच ठेकेदाराला मिळताना दिसत आहे. विशेष म्हणजे तो महापालिकेचा जावई असल्याप्रमाणे त्यालाच कामे मिळवून दिली जात आहेत. या ठेकेदाराला हे काम देताना महापालिका प्रशासनातील अधिकारी संगनमत करतात. ते संबंधित ठेकेदारांना आगाऊ माहिती पुरवतात, त्यातून आर्थिक लाभ पदरात पाडून घेतात. इतर ठेकेदारांना स्पर्धेत भाग घेऊ देत नाही, दमदाटी, दादागिरी करतात, रिंग करतात. हे आपल्याला सर्व आपल्याला माहीत असतानाही आपण या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे शहरातील करदात्या नागरिकांचे आर्थिक नुकसान होते, असाही आरोप मारुती भापकर यांनी केला आहे.

# पालिकेच्या जलतरण तलावांवर ठेकेदारांचा ताबा, तिकीट बुकींगसाठी वेगळ्या वेबसाइट, पास देण्यास टाळाटाळ, ठेकेदारांची मनमानी

## महापालिकेच्या जलतरण तलावांवर सुविधांचा अभाव असल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात उन्हाचा कडाका वाढत असल्याने जलतरण तलावांवर पोहण्यासाठी नागरिकांची गर्दी वाढत आहे. मात्र, महापालिकेच्या जलतरण तलावांवर सुविधांचा अभाव असल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. महापालिकेच्या १३ जलतरण तलावांपैकी १० तलाव ठेकेदारांच्या ताब्यात असून दोन तलाव दुरुस्तीच्या कामामुळे बंद आहेत. तिकिट बुकींगसाठी वेगवेगळ्या वेबसाइट, मासिक पास देण्यास टाळाटाळ, बॅचबाबत ठेकेदारांची मनमानी यामुळे पोहण्यासाठी नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

शहरात पालिकेचे १३ तलाव आहेत. त्यापैकी आकुर्डी प्राधिकरण व मोहननगर हे दोन तलाव दुरुस्तीच्या कामामुळे बंद आहेत. केशवनगरचा एक तलाव पालिकेकडून संचलित केला जातो. मात्र, इतर १० सार्वजनिक जलतरण तलावांचे व्यवस्थापन ठेकेदारांमार्फत केले जाते. तीन वर्षांसाठी ते चालविण्यास दिलेले आहेत. यामध्ये ठेकेदार तिकीट विक्री, स्वच्छता, सुरक्षा आणि पाणी शुद्धीकरण यांसारखी कामे ठेकेदार पाहणार आहेत. त्यांच्यावर महापालिका देखरेख करणार आहे. यामुळे महापालिकेच्या कोट्यवधी रुपयांची बचत होईल, असा दावा प्रशासनाने केला आहे.



मात्र, ठेकेदारांकडून महापालिकेच्या नियमांना धाब्यावर बसवण्याचे काम केले जात आहे. बहुतांश ठिकाणी शॉवर बंद असतात. अस्वच्छता असते. तिकिट बुकींग करताना अडचणींचा सामना करावा लागतो. जलतरण तलावासाठी ऑनलाइन तिकिट बुक करताना पालिकेच्या संकेतस्थळावरून एका आयडीवरून तीन तिकिटे बुक करता येतात. तसेच, ऑनलाइन पासही काढता येत होता.

मात्र, ठेकेदारांच्या संकेतस्थळावरून एकच तिकीट बुक होत असून पासधारकांसाठी ऑनलाइनची सुविधा उपलब्ध नाही. नागरिकांना दोन्ही ठिकाणी वेगवेगळ्या पध्दतीने लॉगिन करावे लागते. मासिक पास देण्यास टाळाटाळ केली जाते. बॅचबाबत संस्थांची मनमानी केली जाते. पाऊण तासावरून अर्ध्या तासाचीच बॅच अनेक ठिकाणी आहे. ठेकेदारांकडून नागरिकांची गैरसोय केली जात असून याकडे महापालिका प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे

### ठेकेदारी संस्थांचा खासगी क्लासवर भर

» अनेक ठेकेदार जलतरण तलावावर खासगी स्विमिंग क्लास घेतात. त्याचे शुल्क २ हजार रुपयांपासून १५ हजार रुपयांपर्यंत आहे. ठेकेदार महापालिकेच्या जलतरण तलावांचा वापर करून पैसा कमावत आहे. मात्र, यामुळे पोहण्यासाठी जाणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. शाळांना उन्हाळी सुट्ट्या लागल्यानंर विद्यार्थ्यांची पोहण्यासाठी संख्या वाढते. असुविधांमुळे पालक व विद्यार्थी यांचा हिरेमोड होत आहे.

> महापालिकेने ठरवून दिलेले दर आकारण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. खासगी ठेकेदारांना चालवण्यासाठी दिलेल्या जलतरण तलावांची वेबसाइट वेगळी आहे. तिथे तिकीट बुक करण्यासाठी प्रक्रिया सुलभ करण्याच्या सूचना ठेकेदारांना दिल्या आहेत.
>
> - पंकज पाटील, सहायक आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

# लाठ्याकाठ्या खाऊ; पण विमानतळ नकोच

## पुरंदरमधील सातही गावाचा विरोध कायम : वनपुरी येथील बैठकीत ग्रामस्थांचा निर्धार

पिंपरी | प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने पुरंदर तालुक्यातील आपल्या गावांची विमानतळ प्रकल्पासाठी निवड केली असून प्रकल्प करण्यासाठी शासनाने पूर्ण तयारी केली आहे. आपल्याला पुढील काळात अनेक आव्हाने पार पाडावी लागणार आहेत. प्रकल्पाच्या नावाखाली बाहेरचे लोक येवून मालक होतील आपले पिढ्यान्पिढ्याचे गाव सोडून कायमचे विस्थापित व्हावे लागेल आपल्या मदतीला कोणी येणार नाही. गुंडगिरी वाढेल आपण इथले मालक असताना बेरोजगार होईल. यासाठी शासनाला विरोध करताना पोलिसांच्या लाठ्याकाठ्या खाऊ; पण प्रकल्पाला आपला विरोध कायम ठेवू, असा निर्धार वनपुरी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला आहे.

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, पारगाव, कुंभारवळण, एखतपूर, खानवडी, मुंजवडी या सात गावांमध्ये विमानतळ प्रकल्प जाहीर केला असून प्रकल्पाच्या बाबतीत दररोज वेगवेगळे आदेश शासनाच्या वतीने पारित केले जात आहेत. यामुळे स्थानिक ग्रामस्थ अधिक चिंताग्रस्त झाले असून सर्व गावांतील ग्रामस्थांकडून प्रकल्पाला जोरदार विरोध केला जात आहे. यासाठी दररोज गावोगावी वाड्यावस्त्यांवर बैठका घेण्यात येत असून या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या जात आहेत.

प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या वनपुरी येथे पाडव्याच्या निमित्त आयोजित बैठकीत शासनाचा निषेध करण्यात आला. यावेळी लोकशासक आंदोलनाचे राज्य संघटक राजेंद्र गायकवाड, पीएस मेमाणे, माजी सरपंच रामदास कुंभारकर, नामदेव कुंभारकर, संजय कुंभारकर, पारगाव उपसरपंच चेतन मेमाणे, मच्छिंद्र कुंभारकर, संतोष हगवणे, संतोष कुंभारकर, शिवाजी कुंभारकर, राजेंद्र कुंभारकर तात्यासाहेब मगर, बाळासाहेब कुंभारकर, माउली कुंभारकर, हनुमंत कुंभारकर, सयाजी कुंभारकर तुकाराम महामुनी, लंकेश महामुनी, सतीश कुंभारकर, सोमनाथ कुंभारकर, महादेव कुंभारकर, तान्हुबाई कुंभारकर, वैशाली कुंभारकर, वर्षा कुंभारकर, रेश्मा खेडेकर यांच्यासह महिला, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### महिला आक्रमक, आम्ही घरेदारे बंद करून...

» तुम्ही आम्हाला आवाज द्या, आम्ही घरेदारे बंद करून शासनाच्या विरोधातील लढाईत सहभागी होवू पण विमानतळ प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत होवून देणार नाही. आम्हाला लाठ्याकाठ्यांची भीती नाही. आम्ही खरे मालक असून छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे आहोत हे शासनाने ध्यानात घ्यावे असा थेट इशारा महिलांच्या वतीने तान्हुबाई कुंभारकर, रेश्मा खेडेकर आणि इतर महिलांनी दिला.

> वेळप्रसंगी सर्वांनी जेलमध्ये जाण्याची तयारी ठेवावी. जीवनाची आरपारची लढाई आहे. यापूर्वी आपल्याल राजकीय पाठबळ मिळाल्याने विरोध करणे शक्य झाले; मात्र आता कोणताही राजकीय पाठिंबा मिळणार नाही. आपल्यालाच आपली ताकद पूर्ण क्षमतेने तयार करावी लागणार आहे. वेगवेगळ्या मार्गाने दबावतंत्राचा वापर होईल, माणसे फोडली जातील; मात्र आपण शेवटपर्यंत एकनिष्ठ राहून जमीन वाचविण्यासाठी न्यायालयात जाऊन आपला लढा जिंकू.
>
> - पी. एस. मेमाणे

> आमच्या जमिनीवर शासन परस्पर प्रकल्प उभारत असेल आणि आम्हाला कायमचे विस्थापित व्हावे लागत असेल तर असे प्रकल्प आम्हाला नको आहेत. आमच्या जमिनी काढून घेतल्यावर कोठे जायचे आणि कसे राहायचे? अनेक संघटना नाव बदलासंदर्भात मागण्या करत आहेत. मुळातच विमानतळाचे छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ, असे नामकरण विमानतळाचे घोषणेवेळीच झालेले आहे. तालुक्यातील यापूर्वी अनेक गावांनी विमानतळ व्हावा म्हणून ठराव दिले होते. त्यांनी त्यांचे गावात विमानतळ करावा .
>
> - संतोष हगवणे, बाधित प्रकल्पग्रस्त

# मधुमेहेसाठी शुगर फ्री निळा बटाटा, मंचर येथील शेतकऱ्याने पिकवला

## आंबेगाव तालुक्यातील मंचर येथील बटाटा वाणाचे व्यापारी व प्रयोगशील शेतकरी शांताराम थोरात यांनी आपल्या शेतात प्रायोगिक तत्वावर लागवड यशस्वी ठरली

पिंपरी | प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील मंचर येथील बटाटा वाणाचे व्यापारी व प्रयोगशील शेतकरी शांताराम थोरात यांनी आपल्या शेतात प्रायोगिक तत्वावर लागवड केलेल्या मधुमेह (शुगर-फ्री )कुफरी निळकंठ जातीच्या (निळ्या बटाटा) वाणाची केलेली लागवड यशस्वी ठरली असून त्यांना या शुगर फ्री निळ्या बटाट्याचे चांगले उत्पन्न निघाले आहे. कुफरी निळकंठ बटाटा लागवडीचा हा या भागातील पहिलाच प्रयोग हा बटाटा मधुमेहाच्या रुग्णासाठी फायदेशीर असल्याचा दावा करण्यात आला.

मंचर येथील प्रसिद्ध बटाटा बियाणाचे व्यापारी शांताराम थोरात व त्यांचे कुटुंब गेल्या 80 वर्षांपासून बटाटा बियाण्यांचा व्यवसाय करत असून बाजारात आलेल्या नवनवीन बटाटा जातीच्या बियाने लागवडीचा प्रयोग ते आपल्या शेतात दरवर्षी करत असतात.यावर्षी त्यांनी आपल्या शेतात वीस गुंठे क्षेत्रात कुफरी मोहन, कुफरी पुखराज, कुफरी नीलकंठ या तीन जातीच्या बटाट्याच्या लागवडीचा प्रयोग केला होता. यातील कुफरी मोहन, कुफरी पुखराज, हे रेगुलर पांढरे बटाटा असून कुफरी नीलकंठ हा निळा व आतून पांढरा रंग असलेला बाजारात नवीनच आलेला बटाटा आहे.

कृषी विभागामार्फत दरवर्षी बटाटा बियाण्याचे विविध वाण बाजारात विकसित केले जातात. आलेल्या नवनवीन बटाट्याचे व्हरायटीचे प्रयोग आम्ही घरच्या शेतीत करत असतो किंवा राहुरी विद्यापीठ या ठिकाणी प्रयोग घेतले जातात. हा बटाटा उत्पादनास छान असून करपा रोगाला लवकर बळी पडत नाही.



### सर्व अभ्यास करूनच घेतले उत्पादन

» उत्पादन केलेला निळा बटाटा हा मधुमेह रुग्णांसाठी खूप उपयुक्त असून यावर सर्व प्रकारे अभ्यास करून तो बाजारात उपलब्ध करावा की नाही ? तो खाण्यास योग्य आहे की नाही ? महाराष्ट्रातील वातावरणात हा बटाटा टिकेल की नाही? याचा सर्व अभ्यास करून तो लागवड करण्यात आला होता. हा प्रयोग यशस्वी झाला असून महाराष्ट्रातील ग्राहकांना याबाबत अजून फारसे माहित नसल्याचे शांताराम थोरात यांनी सांगितले.

### उत्तर भारतात थोड्याफार प्रमाणा पिकवतात

» कुफरी नीलकंठ निळा बटाटा हा भारतातील उत्तर भारतातील काही राज्यांमध्ये थोड्याफार प्रमाणात पिकवला जात असून दोन वर्षांपूर्वी त्याचे वाण (बियाणे) विकसित केले आहे. या बटाट्यात अँटिऑक्सिजन मोठ्या प्रमाणात असून शरीरासाठी उपयुक्त असलेल्या विविध घटकांचे प्रमाण चांगल्या प्रकारे असल्याने हा बटाटा दैनंदिन आहारात मोठ्या प्रमाणात वापरला जाणार आहे.